अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ या नवीन रेल्वे मार्गाकरीता रु.७५.०० कोटी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. आरएलवाय-०९०९/प्र.क्र.२४४ (भाग-२)/परिवहन-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २२ मार्च, २०१८

<u>वाचा</u> : १) गृह विभाग शासन निर्णय क्र. आरएलवाय-०११३/७९८/प्र.क्र.२/२०१३/परि-५, दिनांक : १० जून, २०१५
२) मुख्य अभियंता (बांधकाम), मध्य रेल्वे मुंबई यांचे पत्र क्र.EW/ १६६/BA/ BG/ २०१७-१८, दिनांक १४.०३.२०१८
३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल २०१७

<u>प्रस्तावना :</u>

अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ या नवीन रेल्वेमार्गाकरीता रू.२८२६ कोटी एवढा खर्च अंदाजित असून उक्त खर्चापैकी रू.१४१३ कोटी एवढा ५० टक्के हिस्सा राज्य शासनाकडून केंद्रीय रेल्वे बोर्डास उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य शासनाने मंत्रिमंडळाच्या स्तरावर घेतलेला आहे. त्यानुसार सदर रेल्वे मार्गाकरीता राज्य शासनाने फेब्रुवारी २०१८ अखेर पर्यंत एकूण रू.७१६.८४ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे. या रेल्वे प्रकल्पाकरीता याच कालावधीत रेल्वे विभागाने रु.८७१.९६ कोटी इतका निधी वितरीत केलेला आहे. राज्य शासनाच्या हिश्याचे समप्रमाण राखण्यासाठी सन २०१७-१८ करिता रेल्वे विभागाने दिनांक १४.०३.२०१८ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार या रेल्वे प्रकल्पासाठी अर्थसंकल्पित झालेल्या निधीपैकी रू.७५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी (Financial Adviser and Chief Accounts Officer (Construction) Mumbai CST), मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई यांना प्रस्तावनेत नमूद प्रयोजनासाठी रु.७५.०० कोटी (रुपये पंचाहत्तर कोटी फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यास राज्य शासन या निर्णयाव्दारे मंजूरी देत आहे.

२. शासनाने उप सचिव (परिवहन), गृह विभाग यांना नियंत्रण अधिकारी व शासनाच्या अवर सचिव, रोख शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केले असून, या शासन निर्णयाव्दारे त्यांना सदर रक्कम प्रदान करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. यासाठी येणारा खर्च सन २०१७-१८ या वर्षात मागणी क्र.बी-७, ३००१ भारतीय रेल्वे धोरण निश्चिती संचालन, संशोधन व इतर संकीर्ण संघटना, (००) ८०० इतर खर्च (००) (०२) रेल्वे प्रकल्पामध्ये

राज्य शासनाचा सहभाग (३००१००५४) ३२ अंशदाने या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर देयकांन्वे आहरीत करण्यात येणा-या रक्कमेचे स्वरुप “अंशदाने” या तपशीलवार शिर्षाखाली येते. त्यानुसार तपासणी करावयाच्या सूचीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे तसेच उक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ ते १८ मधील अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.

५. प्रमाणित करण्यात येते की, शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल २०१७ सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मधील १ ते १० तसेच शासन परिपत्रकातील ७ ते १८ अटींची पूर्तता होत आहे.

६. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल २०१७ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या अधिकारांनुसार हे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२२१७०१२५१४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Kranti B. Patil

Digitally signed by Kranti B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ff9761db1faa1460e27b4ede45ea06864712590bd05d7ff12b360f63975c0187, cn=Kranti B. Patil
Date: 2018.03.22 17:03:40 +05'30'

(क्रांती पाटील)

कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रति,

१) महालेखापाल, १ व २ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर
२) सचिव, केंद्रीय रेल्वे बोर्ड, रेल्वे मंत्रालय, रेल भवन, नवी दिल्ली.
३) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई / दक्षिण मध्ये रेल्वे, सिकंदराबाद.
४) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
७) बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) वित्त विभाग, व्यय-८/बीयुडी-११, मंत्रालय, मुंबई.
९) नियोजन विभाग, कार्यासन १४६१, मंत्रालय, मुंबई.

१०) रोख शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर रक्कमेचा धनादेश Financial Adviser and Chief Accounts Officer (Construction), Mumbai CST यांच्या नावाने काढण्यात यावा.

११) निवड नस्ती परिवहन -५.

प्रत- माहिती करिता

१) मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा.प्रधान सचिव (परिवहन) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.